ग्राम न्यायालय पोलादपूर, जिल्हा रायगड यांचेसाठी कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणेबाबत ...

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांकः डीडीओ २०१६/प्र.क्र.७९/का.१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २५ मार्च, २०१९

वाचा -

१ **शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः डीडीओ २०१८/प्र.क्र.२९/का.१२, दिनांक १० एप्रिल, २०१८**

२ **शासन अधिसुचना, विधि व न्याय विभाग क्रमांक ग्रामन्या ४११५/प्र.क्र.१३०/का.१२, दिनांक २२.१२.२०१५**

३ **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, रायगड यांचे पत्र क्रमांक प्रशा/९४४/सन २०१९, दिनांक १२.०२.२०१९**

प्रस्तावना -

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये न्यायाधिकारी, ग्राम न्यायालय पोलादपूर, जिल्हा रायगड यांना कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात आले आहे. संदर्भाधीन दिनांक १२.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश रायगड यांनी ग्राम न्यायालय पोलादपूर, जिल्हा रायगड यांचेकरीता दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी महाड यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याची विनंती केली आहे. त्या अनुषंगाने संदर्भाधीन दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय -

संदर्भाधीन अ.क्र. (१) येथील शासन निर्णय दिनांक १० एप्रिल, २०१८ अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. ग्राम न्यायालय पोलादपूर, जिल्हा रायगड अलिबाग हे ग्राम न्यायालय दिनांक १७.०१.२०१६ पासून संदर्भाधीन अ.क्र. (२) येथील अधिसूचनेनुसार कार्यान्वित झाले आहे. सदर न्यायालयातील न्यायिक अधिकारी व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते, तसेच, इतर कार्यालयीन व न्यायालयीन खर्चाची देयके सादर करण्यास व धनादेश वटविण्यास दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर आणि प्रथम वर्ग

न्यायदंडाधिकारी महाड, जिल्हा रायगड यांना "कार्यालय प्रमुख" तसेच, “आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर आदेश वित्तिय बाबींपुरतेच मर्यादीत राहतील.

३. सदर शासन निर्णय, वित्तिय अधिकार नियमपुस्तिका १९७८, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील भाग पहिला, उप विभाग १ मधील अनुक्रमांक ३, नियम क्रमांक २ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२५१६३०३२८११२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagyashree Rajendra Bhaidkar

Digitally signed by Bhagyashree Rajendra Bhaidkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d567849462918ceb7579bb2b56247e927c039bbdf02802 2a8b9ce837a7c854bb, serialNumber=fb84fefefe4ee219c1bc35b35201c14eab0903e8194a 7413a74eed93f32afdb0, cn=Bhagyashree Rajendra Bhaidkar
Date: 2019.03.25 16:35:01 +05'30'

(भाग्यश्री भाईडकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रबंधक (निरीक्षणे १ / २), मा.उच्च न्यायालय, मुंबई,
२. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय रायगड, अलिबाग,
३. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, महाड / न्यायाधिकारी, ग्राम न्यायालय पोलादपूर, रायगड, अलिबाग,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), १ / २, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
५. जिल्हा कोषागार अधिकारी रायगड,
६. उप कोषागार अधिकारी रायगड,
७. वित्त विभाग, व्यय-५ / आ.पु.क./ विनियम, मंत्रालय, मुंबई
८. कक्ष अधिकारी, का.२३/ २४ /२५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. निवडनस्ती (का.१२)